# निवडक अग्रलेख व पत्रे

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**निवडक अग्रलेख व पत्रे**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ ३७०/-

# *अनुक्रमणिका*


| | | |
|---|---|---|
| १. | प्रार्थना समाज........................................... | ७ |
| २. | गतवर्ष.................................................. | १० |
| ३. | धर्मवैर ................................................ | १३ |
| ४. | शेतकीची सुधारणा....................................... | १५ |
| ५. | डेक्कन कॉलेज........................................... | १८ |
| ६. | हिंदुस्थानास स्वतंत्र राज्यरीतीचा<br>लाभ केव्हा होईल? .................................... | २४ |
| ७. | राजकीय व सामाजिक सुधारणांचे बोडण<br>अथवा एक अजागळपणाची सूचना .................... | २७ |
| ८. | आमच्या मुसलमान भाईंस चार शब्द ................... | ३० |
| ९. | मानवी धर्मकल्पनांचा उदय, उत्कर्ष आणि ऱ्हास........ | ३३ |
| १०. | 'शेषं कोपेन पूरयेत्'..................................... | ३८ |
| ११. | सिंहावलोकन ........................................... | ४१ |
| १२. | रा. रा. विश्वनाथ नारायण मंडलिक .................... | ४७ |
| १३. | तुळशीबागेतील प्रचंड सभा............................. | ५२ |
| १४. | संबंध का तोडिला पाहिजे?............................. | ५८ |
| १५. | मुंबई येथील शेणवी लोकांच्या ज्ञातीची सभा........... | ६२ |
| १६. | शारदासदन व रा. ब. रानडे यांची मध्यस्थी............. | ६६ |
| १७. | पुराव्याचे माप घ्या....................................... | ७० |
| १८. | पंडिता रमाबाई-१ ....................................... | ७८ |
| १९. | पंडिता रमाबाई-२ ....................................... | ८३ |
| २०. | इंग्रजी भाषा व देशी भाषा-१........................... | ८६ |
| २१. | इंग्रजी भाषा व देशी भाषा-२........................... | ९० |
| २२. | वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा भाषण समारंभ................. | ९४ |

२३. प्रायश्चित्त व तडजोड .................................. ९८
२४. प्रायश्चित्त व स्वरूप .................................... १०४
२५. प्रायश्चित्त स्वरूपाविषयी................................ ११०
२६. धर्मातील बेबंदशाही..................................... ११५
२७. कै. वामन शिवराम आपटे .............................. १२२
२८. ज्ञातीसंबंधीचा निबंध.................................... १२७
२९. सरदार रावबहादूर
गोपाळ हरी देशमुख..................................... १३०
३०. पाचवी प्रांतिकसभा..................................... १३२
३१. पंचहौद प्रकरण ......................................... १३४
३२. पंचहौद प्रकरण ......................................... १३५
३३. ग्रामण्य ................................................. १३६
३४. टिळक विरुद्ध आगरकर ................................ १३८
३५. पंचहौद ................................................. १४०
३६. पंचहौद–आगरकरांची माफी............................. १४२
३७. सुधारक.................................................. १४३
३८. सायन का निरयण?–१ .................................. १४५
३९. सायन का निरयण?–२.................................. १५३
४०. सायन का निरयण?–३ .................................. १६१
४१. नेहमीचे खोडसाळ कोण?............................... १६३
४२. पुण्यातील धर्मवेडाचा दंगा आणि खून होण्याचा संभव.. १६९
४३. शारदासदन ऊर्फ विधवा मिशनगृह ...................... १७८
४४. मि. जस्टिस काशीनाथ त्रिंबक तेलंग ................... १८३
४५. यंदाची प्रांतिक सभा.................................... १८७
४६. श्री.सयाजीराव महाराज गायकवाड...................... १९०
४७. नारायण कृष्ण धारप यांचा मृत्यु ........................ १९५
४८. ॲनी बेझंट ............................................ १९८
४९. मिसेस ॲनी बेझंट यांची व्याख्याने ..................... २००
५०. कापडावर कर .......................................... २०९

५१. मुंबई सरकार व सार्वजनिक सभा........................ २१५
५२. पोलिसचा जुलमी कायदा............................... २१९
५३. सरकारी जाहिराती ...................................... २२३
५४. बोललेच पण जरा सांभाळून बोलले.................... २२५
५५. आठवी प्रांतिक सभा ................................... २३०
५६. प्रो. वासुदेव बाळकृष्ण केळकर
यांचा अकालिक मृत्यु.................................. २३४
५७. बडोद्यातील राज्यकारभार............................... २३७
५८. वेदांतसूत्रावर अभिप्राय.................................. २४३
५९. अकराव्या राष्ट्रीय सभेची तयारी.......................... २४५
६०. सार्वजनिक सभेचा वाद................................. २४९
६१. ख्रिस्ती उपदेशकाची सारवासारव........................ २५४
६२. राष्ट्रीय सभेच्या कामात झालेला बखेडा
मोडण्याचा उपाय ....................................... २५७
६३. पुण्यातील घोटाळ्याचा निकाल......................... २६२
६४. खोट्या तारांचे प्रकरण.................................. २६९
६५. मुक्तिफौजेचे उद्योग...................................... २७१
६६. मि. मॅकडोनेल.......................................... २७३
६७. बाबू मनमोहन घोष यांचे बंगाल्यातील
सामान्य सुधारणेवर विचार.............................. २७५
६८. मि. मनमोहन घोष यांचे कैवारी......................... २७८
६९. पंडिता रमाबाईसंबंधी.................................... २८३
७०. पंडिता रमाबाई.......................................... २८६
७१. काँग्रेसचे परिवर्तन........................................ २८८
७२. समाजसुधारणेचा कायदा................................ २९०
७३. गोपाळराव गोखल्यांच्या पत्रासंबंधी...................... २९२
७४. कलकत्त्याची काँग्रेस..................................... २९६
७५. बारावी राष्ट्रीय सभा...................................... २९९

✦✦✦

# १. प्रार्थना समाज

**धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायाम्।।**

धर्मासारखा वादग्रस्त आणि नाजुक जगात दुसरा कोणताही विषय नसेल. धर्मनिष्ठ जे आहेत, त्यांना त्यांचा धर्म जीवित्वापेक्षाही अधिक प्रिय असतो. अनेक महात्म्यांनी आपल्या धर्माच्या रक्षणासाठी किंवा त्याचा प्रसार होण्यासाठी आपल्या अस्तित्वाची आहुती दिल्याची उदाहरणे इतिहासांत थोडी आहेत असे नाही. प्रत्येक धर्माला त्याचा पूर्ण अभिमान बाळगणारे असे काही नि:सीम भक्त असतात व कित्येक त्याच्या छत्राखाली उगीच पडून राहिलेले असतात. नि:सीम जे असतात त्यांना त्यांच्या धर्माला कोणी यत्किंचित दोष दिला तर मोठा संताप उत्पन्न होतो, हे फार स्वाभाविक आहे. यासाठी राष्ट्राराष्ट्रांमध्ये बहुत कालपर्यंत दारुण धर्मयुद्धे झाल्यानंतर सर्वानुमते असे ठरले की धर्मसंबंधाने ज्याला त्याला स्वातंत्र्य असावे. आपल्याकडेही वैदिक आणि बौद्धधर्मानुयायी यांच्यात रणे पडून सरतेशेवटी बौद्धधर्माला तरवारीमुळे या देशाचा त्याग करावा लागला. निबंधारंभी घातलेले वाक्य कोणी कधीही रचिलेले असो, त्या शब्दात जितका बोध आहे तितका दोनचार हजार पानांच्या ग्रंथांतही नसेल. धर्मतत्त्व कोणासच उमगलेले नाही ते गुहेत ठेविलेले आहे. यासाठी ते आपणास गवसले असा वृथा अभिमान धरून कोणी कोणाशी व्यर्थ कलह करू नये, तर ज्याने त्याने या संबंधात आपापल्या धोरणाने चालावे यापेक्षा आणखी स्तुत्य उपदेश तो कोणचा असणार? आपणास ईश्वरप्रसाद आहे असे वाटल्यावरून कित्येक बुद्धिवान, उद्योगी, निरपेक्ष व नीतिकुशल अशा पुरुषांनी आपापल्या समजुतीप्रमाणे अनेक धर्मांच्या संस्थापना केल्या, व देशकालमानाने त्या त्या धर्माचा विस्तारही होत गेला. कोणत्याही देशात धर्मांतर होणे म्हणजे पहिल्या धर्माचा वीट येऊन त्यातच छाटाछाट करण्याचा किंवा त्याच्या जागी नवीनच एखाद्या धर्माची स्थापना करण्याचा विचार येणे हे बारीक दृष्टीने पाहता त्या देशाच्या मागल्या इतिहासाच्या ओघाचा नैसर्गिक परिणाम होय असे वाटते. हा दोन कारणांसाठी म्हणजे एकतर धर्मतत्त्व गुहेंत ठेविले असल्यामुळे कोणासच उमगत नाही म्हणून, आमच्या

देशाच्या इतिहासाच्या ओघाप्रमाणे जुन्या हिंदु धर्माचा कंटाळा येऊन ब्राह्मो समाज, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, यासारख्या नूतन धर्माच्या घासाघाशीत मुळीच पडावयाचे नाही, असा आमचा पूर्वीपासून कृतसंकल्प खरा; पण पूर्वी आम्ही 'अनुकरणावर' लिहिता लिहिता प्रार्थनासमाजावर जो एक निबंध लिहून गेलो त्यामुळे त्या धर्माच्या कित्येक अनुयायांस वाईट वाटले असेल; व त्यांच्याच एका 'कैवल्या'कडून एक चरचरीत पत्र आम्हांकडे आले, व ते आम्ही पत्रव्यवहाराखाली छापिले आहे. त्यात आम्हांवर जे आक्षेप आहेत त्यातील तात्पर्य हे की प्रार्थनासमाजात गायनयुक्त उपासना करण्याचा व स्त्रियांस पुरुषांसमवेत प्रार्थनेस आणण्याचा जो परिपाठ आहे, तो ख्रिस्तीधर्माच्या अनुकरणाने पडला असावा असे वाटल्यावरून तो आम्ही वावगा म्हटला, हे चांगले केले नाही. एकतर, सगळाच हिंदुधर्म अगदी कवडीच्या मोलाचा आहे अशी खात्री होऊन तो सोडावा, व दुसऱ्या एखाद्या नवीन पंथाचा अंगीकार करावा, असे आम्हांस वाटत नसल्यामुळे प्रार्थनासमाजाच्या मतांची बारीक सारीक माहिती मिळविण्याच्या भरीस आम्ही अजून पडलो नाही, आम्ही त्या संबंधाने जे लिहिले ते आम्हास त्याच्या बाह्य स्वरूपावरून साधारणत: जे वाटले ते लिहिले. आम्ही आमच्या देवळातील कथाकीर्तने पाहिली आहेत, व प्रार्थनासमाज आणि आर्यसमाज यातील उपासनाही ऐकिल्या आहेत. त्यावरून अजूनही आमचा असा समज आहे की, या नवीन पंथाचे, बाह्य स्वरूपात तरी हिंदुधर्मापेक्षा ख्रिस्ती धर्माशी विशेष साम्य आहे, दुसरे, प्रार्थनेसाठी स्त्रीमिश्रित पुरुष समाज असावा की नाही, या गोष्टीचा विचार करिता तसे नसावे, असे आमचे मत आहे.

**'मन हे ओढाळ गुरु, परधन परकामिनीकडे धावे'**

ह्या पंतवाक्यावर आमचा बराच भरवसा आहे. आणखी असे वाटते की, आमच्या स्त्रियांच्या स्थितीचा विचार करिता युरोपियन लोकांप्रमाणे प्रार्थनामंदिरात तर काय पण इतर ठिकाणी देखील स्त्री-पुरुषांचा मिश्रसमाज करण्याचा समय अद्याप आला नाही. आमच्या स्त्रिया अद्याप केवळ अज्ञान दशेत आहेत; यास्तव धर्मासारख्या महत्त्वाच्या विषयावर त्यांनी इतक्यात ढवळाढवळ करायला पाहिजे असे काही नाही. निदान सध्या तरी त्यांची जुनीच पद्धत त्यांस बरी आहे असे आम्हांस वाटते. आमच्यातल्या पुरुषमंडळीने सद्धर्माची स्थापना करून आपली स्थिती अगोदर सुधारली, म्हणजे मग आमच्या देशभगिनीस पारमार्थिक उन्नती देण्याचा उद्योग तेव्हाच करता येईल. वर्षानुवर्षे सद्धर्माचा विचार व त्यांचे आचरण करूनही केशवचंद्र

सेन व महादेव मोरेश्वर कुंटे अशा धेंडांच्या कृतीत जर इतकी चलबिचल दिसते, तर ज्या बापड्याबायांस नुसते र ट फ करण्यापुरते सरासरी ज्ञान असेल नसेल त्यांनी निराकार ईश्वराच्या मंदिरात प्रार्थनेस आलेच पाहिजे असे आम्हांस वाटत नाहीं. 'खोप्याच्या संबंधाने' कैवारीस इतके वाईट वाटावयास नको होते. आपणास मान्य नाही अशा गोष्टीच्या संबंधाने लिहित असता लेखणीस थोडे अल्लड होऊ देणे सर्वच मनुष्यांस साधारण आहे. दूर कशाला, आमच्या 'कैवारी'स परमपूज्य जे. रा. ब. रानडे यांनीच गेल्या वसंत व्याख्यानपरंपरेच्या वेळेस हिराबागेत गणपतीची कोण टर उडविली होती हे सर्वांस महशूर आहे. असो; नवीन पंथाच्या संबंधाने विचार सुचत आहेत ते लिहून आटपते घेतो. एकंदर देशस्थितीचा विचार करिता व बहुतेक मनुष्याच्या अंत:करणात धर्मकल्पना नैसर्गिक रीतीने उत्पन्न होते असे मानून धर्मसंबंधाने विचार करू लागलो म्हणजे असे वाटते की, थोड्या वर्षांत पुराण हिंदुधर्माचा शोध करून त्याला अधिक शुद्धी आणावी लागेल किंवा प्रार्थना-समाजासारखे नवीन पंथ स्थापावे लागतील यात काही संशय नाही.

अलीकडे ज्या प्रकारच्या सुधारणेची प्रवृत्ती पडत चालली आहे, तिला अनुकूल असा हा नवीन पंथ आहे हे आम्ही प्रांजलपणे कबूल करितो. आम्हांस इतकेच वाईट वाटते की, या नवीन पंथाचा अजून कोणी शंकराचार्य निपजत नाही. प्रोफेसर भांडारकर किंवा रा. बा. अ. मोडक हे आमच्या 'कैवारी'स जसे पूज्य आहेत तसे ते आम्हांसही आहेत. पण संसारकरू धर्मपरायणांच्या हातून या नूतन पंथप्रसाराबद्दल जेवढी खटपट होत आहे तेवढीच बस्स नाही. या धर्मशील पुरुषांच्या पाठीमागे या पंथास मोठा धक्का बसेल असे आम्हांस वाटते. शिवाय केशवचंद्र सेन किंवा मि. कुंटे यासारख्या धरसोड करणाऱ्या मंडळींच्या योगाने धर्मोन्नतीचे काम निभत नाही. यासाठी या नवीन पंथाची चोहोकडे छाप बसण्यास व याच्या सोज्ज्वल मतांचा प्रसार होण्यास शंकराचार्यांसारखे पुरुष निपजले पाहिजेत. बाकी हिंदुधर्माचा कंटाळा येऊन एकदम ख्रिस्ती धर्मात धाव घेणाऱ्याला मध्यन्तरावर काही अंशी हिंदुधर्माच्या बाजूलाच हे एक 'चर्च' आहे व याच्या योगाने आर्यत्वाचे संरक्षण होईल यात संशय नाही.

-अग्रलेख, दि. ३० ऑगस्ट १८८१

✦✦✦

# २. गतवर्ष

मुंबईच्या हायकोर्टाचा असा कायदा आहे की, त्यांच्या पुढे एखाद्या युरोपियनावरचा खटला चालला असता तो अपराधी आहे किंवा नाही या संबंधाने अभिप्राय देणाऱ्या ज्यूरीत निम्मेहून अधिक युरोपियन लोक असले पाहिजेत. तसेच ज्यूरीतील लोकांचा मतभेद झाल्यास न्यायाधीशास योग्य दिसेल त्याप्रमाणे त्याने न्यून किंवा अधिक मतास अनुसरून खटल्याचा निकाल करावा. या सोईमुळे कोर्टापुढे जो युरोपियन येतो त्याच्या वर्तनाचे खरे स्वरूप तेथल्या तेथेच ज्यूरीतील बहुतेक लोकांना चांगल्या रीतीने समजण्याचा संभव असतो इतकेच नाही, तर तो त्यांच्याच समाजापैकी असल्यामुळे त्यांना आधीच माहिती झालेली असते. शिवाय न्यायाधीश बहुश: त्याच समाजापैकी असल्यामुळे यथास्थित न्याय होण्यास जितक्या साधनांची अनुकूलता असणे जरूर आहे तितकी युरोपीय दोषींच्या खटल्यात एकत्र जुळतात हे उघड आहे. जगाची प्रस्तुत न्यायपद्धती इतकी यांत्रिक आणि कायदेशीर झाली आहे की, बड्या बड्या प्रकरणात खरा प्रकार बाहेर पडण्याची मोठी मारामार पडते; व अनेक वेळा असमाधान होण्याजोगे निकाल होतात. कायदा म्हणजे काय? तर कोणत्याही देशातील बहुतेक शहाण्या लोकांनी त्या देशाच्या व्यवस्थेसाठी विचारपूर्वक केलेले नियम होत. तसेच कोणताही निकाल न्यायाचा झाला असे केव्हा म्हणावयाचे? अर्थात समाजातील बहुतेक शहाण्या लोकांना त्याला दूषण देण्यास जागा राहिली नाही म्हणजे; सारांश काय की ज्या बाबतीत न्यायाधीशाच्या आणि बहुतेक शिष्ट लोकांच्या विचारात जमीन अस्मानाचे अंतर पडले नाही तर तिचा वाजवी निकाल झाला असे मानण्यास हरकत नाही. वस्तुत: लोक चुकतात त्याप्रमाणे अधिकारीही चुकतात. भेद इतकाच की, अधिकारी चुकले म्हणजे निरपराध्यास निष्कारण पीडा सोसावी लागते, इतकेच नाही, तर अधिकारामुळे त्यांना आपल्या चुकीवर पांघरूण घालता येते. अधिकारारूढ जो असतो तो नागवा नाचला तरी त्याला दोष देण्यास कोणी सहसा धजावत नाही हे खरे आहे. आपल्या खुळेपणाचा व ऐश्वर्याचा तोरा मिरवण्यासाठी दातावर मशीदी बांधणारे, आपल्या मूर्खपणाचा आणि